# गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती मंजूर करणे

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>योजना</th><th>सविस्तर माहिती</th></tr>
<tr><td>1</td><td>योजनेचे नाव</td><td>गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती मंजूर करणे</td></tr>
<tr><td>2</td><td>योजने बद्दलचा शासन निर्णय</td><td>उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण-2018/प्र.क्र.218/तांशि-4.<br>दि. 4ऑक्टोंबर, 2018.</td></tr>
<tr><td>3</td><td>योजनेचे स्वरूप</td><td>महाराष्ट्र राज्यातील खुल्या प्रवर्गातील जे गुणवंत विद्यार्थी पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदविका व पीएचडी अभ्यासक्रमासाठी THE(Times Higher Education)/किंवा QS (Quacquarelli Symonds) Ranking 200 च्या आतील परदेशातील शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश घेतील, अशा 20 विद्यार्थ्यांना प्रतिवर्षी खालीलप्रमाणे परदेशी शिष्यवृत्ती तंत्रशिक्षण संचालयाकडून मंजूर करण्यात येते.
<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>शाखा / अभ्यासक्रम</th><th>पदव्युत्तर पदवी व पदव्युत्तर पदविका</th><th>डॉक्टरेट</th><th>एकूण</th></tr>
<tr><td>1</td><td>कला</td><td>1</td><td>1</td><td>2</td></tr>
<tr><td>2</td><td>वाणिज्य</td><td>1</td><td>1</td><td>2</td></tr>
<tr><td>3</td><td>विज्ञान</td><td>1</td><td>1</td><td>2</td></tr>
<tr><td>4</td><td>व्यवस्थापन</td><td>1</td><td>1</td><td>2</td></tr>
<tr><td>5</td><td>विधी अभ्यासक्रम</td><td>1</td><td>1</td><td>2</td></tr>
<tr><td>6</td><td>अभियांत्रिकी / वास्तुकला शास्त्र</td><td>4</td><td>4</td><td>8</td></tr>
<tr><td>7</td><td>औषधनिर्माण शास्त्र</td><td>1</td><td>1</td><td>2</td></tr>
<tr><td></td><td>एकूण</td><td>10</td><td>10</td><td>20</td></tr>
</table></td></tr>
<tr><td>4</td><td>योजनेचा उद्देश</td><td>महाराष्ट्र राज्यातील खुल्या प्रवर्गातील जे गुणवंत विद्यार्थी आहेत त्यांना परदेशात जाऊन शिक्षण घेता यावे.</td></tr>
<tr><td>5</td><td>योजना ज्या प्रवर्गासाठी लागू आहे त्याचे नाव</td><td>ही योजना खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना लागू राहील.</td></tr>
<tr><td>6</td><td>योजनेच्या प्रमुख अटी</td><td>1. विद्यार्थी व विद्यार्थ्यांचे आई/वडील अथवा पालक भारताचे नागरिक तसेच महाराष्ट्र राज्याचे अधिवासी असावेत.<br>2. विद्यार्थ्याला परदेशात THE/QS अद्ययावत वर्ल्ड रॅन्कींगमध्ये 200 च्या आत असलेल्या शैक्षणिक संस्था / विद्यापीठामध्ये गुणवत्तेनुसार प्रवेश मिळालेला असावा.<br>3. विद्यार्थ्यांने पदव्युत्तर किंवा पीएचडी अभ्यासक्रमासाठी अर्ज करताना यापुर्वी इतर कोणत्याही राज्य शासनाची अथवा केंद्रशासनाची परदेशी शिष्यवृत्ती घेतलेली नसावी. तसेच त्यांने अन्य प्रशासनिक विभागाच्या परदेशी शिष्यवृत्तीच्या योजनेसाठी अर्ज केलेला नसावा.<br>4. परदेशातील विद्यापीठ/शैक्षणिक संस्थामध्ये प्रवेश घेणारा विद्यार्थी हा पूर्णवेळ विद्यार्थी म्हणून प्रवेशित असावा.<br>5. एक्झेक्युटीव्ह पदव्युत्तर पदवी किंवा एक्झेक्युटीव्ह पदव्युत्तर पदविका व अर्धवेळ अभ्यासक्रमांस प्रवेशित विद्यार्थी या योजनेसाठी पात्र असणार नाहीत.<br>6. प्रवेशित अभ्यासक्रमासाठी अर्ज करताना नमूद केलेल्या विहीत कालावधीत अभ्यासक्रम पूर्ण करणे विद्यार्थ्यांवर बंधनकारक असेल, अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी मुदतवाढ मान्य केली जाणार नाही.<br>7. सदर योजना उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत तंत्र शिक्षण संचालनालय व उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना पुढील उच्च शिक्षण घेण्याकरिता लागू राहील.</td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| | | 8. पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी लाभार्थ्यांच्या वयाची कमाल 35 वर्ष आणि पीएचडी अभ्यासक्रमासाठी लाभार्थ्यांच्या वयाची 40 वर्ष वयोमर्यादा असावी. (दि. 01 जूलै रोजीचे वय)<br>9. विद्यार्थ्यांच्या कुटूंबाचे सर्व मार्गांनी मिळणारे मागील आर्थिक वर्षातील वार्षिक उत्पन्न रु. 20.00 लाखापेक्षा जास्त नसावे.<br>10. पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांने भारतातील मान्यताप्राप्त विद्यापीठामधून किमान 60 % गुणासहीत पदवी परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी.<br>11. पीएचडी अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांने भारतातील मान्यताप्राप्त विद्यापीठामधून किमान 60 % गुणासहीत पदव्युत्तर पदवी परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी.<br>12. सदर योजनेचा लाभ एकाच कुटूंबातील एका विद्यार्थ्यास फक्त एकदाच घेता येईल.<br>13. ज्या विद्यार्थ्यांना परदेशी शैक्षणिक संस्था कडून Unconditional Offer Letter मिळालेले असेल, त्यांनाच ही शिष्यवृत्ती अनुज्ञेय राहील, यासाठी Conditional Offer Letter गृहीत धरले जाणार नाही. |
| 7 | आवश्यक कागदपत्रे | 1. विहीत नमुन्यातील परिपुर्ण अर्ज<br>2. सक्षम प्राधिकाऱ्यांनी दिलेला उत्पन्नाचा दाखला<br>3. पदवी/पदव्युत्तर पदवी परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे पुरावे.(सनद/मार्कलिस्ट)<br>4. परदेशातील THE/QS World Ranking 200 च्या आत असलेल्या शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश मिळाल्याबाबतचे विनाअट (Unconditionl) ऑफर लेटर<br>5. ज्या विद्यापीठामध्ये प्रवेश मिळाला आहे त्याचे सविस्तर माहिती पत्रकाची प्रत<br>6. आवश्यक ते करारनामे व हमीपत्र.<br>7. दोन भारतीय नागरीकांचे जामीनपत्र<br>8. संपूर्ण अभ्यासक्रम पुर्ण होण्यासाठी वर्षनिहाय आवश्यक असणाऱ्या खर्चाचे अंदाजपत्रक, ज्यामध्ये शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क, इतर शुल्क पाठयपुस्तके, स्टेशनरी, भोजन व राहण्याचा खर्च, येण्याजाण्याचा विमान प्रवास याचा समावेश असावा.<br>9. पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी आणि पीएचडी अभ्यासक्रमासाठी अद्ययावत THE/QS World Ranking ची जागतिक क्रमवारी.<br>10. नोंदणीकृत वैद्यकीय अधिकारी यांनी दिलेले आरोग्य चांगले असल्याबाबतचे प्रमाणपत्र. |
| 8 | दिल्या जाणा-या लाभाचे स्वरुप | 1. शासन निर्णयानुसार शिक्षण शुल्क, निर्वाह भत्ता, वैयक्तीक आरोग्य विमा आदि लाभ अनुज्ञेय आहेत.<br>2. सुरुवातीस परदेशातील शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश घेणे आणि विहित कालावधीत अभ्यासक्रमपुर्ण केल्यानंतर भारतात परत येण्यासाठी नजिकच्या मार्गाने इकॉनॉमी क्लास विमानप्रवासभाडे देण्यात येईल.<br>3. तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडून शिष्यवृत्ती मंजूर झालेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती रक्कम वितरीत करण्याबाबतची कार्यवाही करण्यात येते. |
| 9 | अर्ज करण्याची पध्दत | सदर योजनेसाठी ऑनलाईन पध्दतीने www.dtemaharashtra.gov.in/foreignscholarship2019 या संकेतस्थळावरुन अर्ज भरणे आवश्यक आहे.<br>सदर संकेतस्थळावर ऑनलाईन भरलेल्या अर्जाची प्रत व आवश्यक प्रमाणपत्र व कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती सोबत सदर अर्ज संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांचेकडे मूळ प्रमाणपत्राच्या पडताळणीसाठी सादर करणे आवश्यक आहे. |
| 10 | ऑनलाईन अर्ज करण्याचे संकेतस्थळ | www.dtemaharashtra.gov.in/foreignscholarship2019 |